① December - 2019




मिरा-भाईंदर महानगरपालिका
विधी विभाग
आवक क्र. 01 मा. अ.
दिनांक: 02/12/2019

## केंद्रशासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार २००५

### नमुनापत्र - ३

### माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना

प्रति
शासकिय माहिती अधिकारी,
विधी विभाग,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

१) अर्जदाराचे नाव — वासु दामोदर खोपे. (9137946895)

२) पत्ता — 101- खोपे निवास, गोडदेव गाव, पो. नवघर, भाईंदर (पु.), ता. जि. ठाणे, पीन. 401105.

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल

(एक) माहितीचा विषय — मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत न्यायालयीन दाव्या बाबत

(दोन) माहितीशी संबधित कालावधी — सन 2000 ते आजपर्यंत.

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन — (1) मिरा भाईंदर महानगरपालिका सेवा-महीतील सर्व (प्रभाग क्र. 1 ते 6), अनधिकृत बांधकाम संदर्भातील दावे, (केसेस), संबंधीत दावे, व अंडरटेकींग देऊन स्वतःच बांधकाम काढून टाकण्याचे पत्र (ॲफिडेवीट) देऊन, कालांतर बांधकाम कायम असल्याचे पत्र देणारे दावे, यांची सर्व कागदपत्रे अवलोकनास मिळावीत व आवश्यक त्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळाव्यात.

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे (प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.) — स्वतः.
— नाही.

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र) — नाही.

(सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन — माहितीसाठी.

ठिकाण - मिरा भाईंदर
दिनांक 29/11/2019.

(अर्जदाराची स्वाक्षरी)
(खोपे).

# मिरा भाईंदर महानगरपालिका

जाक्र.मनपा/विधी/मा.अ./०१/२०१९-२०
दि. ०५/१२/२०१९

**प्रति,**

श्री. राजू दामोदर शेवंते
१०१ शेवंते निवास, गोडदेव गाव, पो. खारीगाव
भाईंदर (पु) ता. जि. ठाणे ४०११०५

**विषय :- केंद्र शासनाचा माहिती अधिकार २००५ अन्वये अर्ज.**

**संदर्भ** :- आपला दि. २९/११/२०१९ (प्राप्त दि. ०२/१२/२०१९) रोजीचा अर्ज.

**महोदय,**

आपण संदर्भिय माहिती अधिकाराच्या अर्जान्वये आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम संदर्भातील दावे, प्रलंबित दावे, अंडरटेकींग देऊन स्वतः बांधकाम काढून टाकल्याचे पत्र (ॲफिडेव्हीट) देऊन बांधकाम काढणार असल्याचे पत्र देणारे दावे यांची सर्व कागदपत्रे अवलोकनास उपलब्ध करुन देणेची मागणी केलेली आहे. तरी आपणास कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेविरुद्ध दाखल प्रकरणांची माहिती महानगरपालिकेच्या www.mbmcrti.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तरी आपण सदर संकेतस्थळावरुन आपणास आवश्यक असलेल्या दाव्यांची माहिती घेऊन विधी विभागास सदर दाव्यांचे क्रमांक उपलब्ध करुन दिल्यास त्या दाव्यांच्या संचिका आपणास अवलोकनाकरीता उपलब्ध करुन देण्यात येतील.

सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्यास आपणास श्री. सुनिल लहाने, मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(मु), तिसरा मजला, मुख्य कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांत प्रथम अपिल दाखल करता येईल.

Vwadke

सई वडके
जनमाहिती अधिकारी तथा विधी अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका